महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेच्या
वाई येथे भरलेल्या,
पंधराव्या वार्षिक अधिवेशनासाठी
लिहिलेले भाषण

# बालशिक्षणाचे नवे आधार
# - नवी दिशा

रमेश पानसे

# बालशिक्षणाचे नवे आधार - नवी दिशा

रमेश पानसे

आपण सर्वजण अत्यंत भाग्यवान आहोत. एकविसाव्या शतकाच्या सुरवातीच्या काळाचे आपण सर्वजण साक्षी आहोत. एकविसावे शतक जन्माला आले आहे तेच मुळी, मोठ्या प्रमाणावरील शास्त्रज्ञान आणि तंत्रज्ञान यांची क्रांती घेऊन. या क्रांतीपर्वात आपण असणे हीच मुळी आपल्या भाग्याची गोष्ट आहे.

दीडशे वर्षापूर्वीच्या अशाच एका क्रांतीकालाची आणि कवीने केलेल्या वर्णनाची आठवण आज माझ्या मनात जागी होत आहे. तो क्रांतीकाल होता फ्रेंच राज्यक्रांतीच्या अनुपम लढ्याचा. वर्डस्वर्थने या क्रांतीचे वर्णन करताना म्हटले आहे,

> Bliss was it, in that down to be alive
> And to be young was very haven !

त्या क्रांतीकालाचे आपण नुसते साक्षी असणे ही सुध्दा भाग्याची गोष्ट होती; आणि त्यावेळी तरुण असणे ही तर स्वर्गीय सुखाची गोष्ट होती !

हेच मी आजच्या काळाविषयी, एकविसाव्या शतकाच्या सुरवातीच्या काळाविषयी म्हणेन. आज वेगाने घडत असलेल्या तंत्रज्ञान आणि शास्त्रज्ञानाच्या क्रांतिपर्वात आपण नुसते असणेही भाग्याचे आहे; आणि या काळाला पुरेपूर अनुभवण्यासाठी, आयुष्याची अनेक वर्षे ज्यांच्या हाती आहेत अशा तरूण पिढीसाठी हा क्रांतीकाल ही तर स्वर्गसुखाची पर्वणी आहे.

ही तुलना इे संपत नाही. फ्रेंच राज्यक्रांतीने, जगाला स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व या मूलभूत मानवी हक्कांची जाणीव आणि त्यावर आधारित अशी लोकशाही जीवनप्रणालीची देणगी बहाल केली; तर आजची शास्त्र - तंत्रक्रांती, आपल्या ओळखीच्या नि अनुभवाच्या लोकशाही जीवनप्रणालीला सक्षमतेच्या नि समृध्दतेच्या दिशेने नेण्यासाठी नवीन साधनप्रणाली प्राप्त करून देत आहे. आणि म्हणून तिचे आपण स्वागत केले पाहिजे.

एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीभोवती पसरलेल्या या शास्त्र - तंत्र क्रांतीने, एका नव्या युगाची सुरुवात करून दिलेली आहे. या युगाला 'ज्ञानयुग' म्हणून आपण ओळखू लागलो आहोत. मानवमुक्तीचे एक लेणे आपल्याला फ्रेंच

राज्यक्रांतीने दिले आहे तर आजच्या शास्त्र – तंत्र क्रांतीने आपल्याला 'ज्ञानमुक्ती'ची कवाडे खुली करून दिली आहेत. आपल्या डोळ्यांशी टीव्ही भिडलेला आहे, कानाशी मोबाईल जोडलेला आहे आणि संगणक आपल्या हाती आला आहे. ज्याची संगणकाशी सलगी झालेली आहे, त्यांना, जगातील कोणतेही ज्ञान, आपल्याला हवे त्या क्षणाला आपल्या लॅपटॉपवर म्हणजे मांडीवर कसे येऊन बसते हे माहीत झाले आहे. जे इंटरनेट वापरू लागले आहेत त्यांना विकिपीडिआ सारख्या जादूभऱ्या सार्वजनिक विश्वकोशाची नीट माहिती असेल. हे खरे आहे की ही सर्व माहिती इंग्रजीत आहे. परंतू तंत्रज्ञानाची एक पुढची पायरीही ओलांडली गेला आहे. आता 'युनिकोड' प्रणालीने 'मराठी संगणक' आपल्याला उपलब्ध आहे. मराठीतून संगणकाशी सलगी करणे आणि या अशा संगणकाकरवी जागतिक ज्ञानाला भिडणे, हे आता आपल्याला शक्य होणार आहे. त्यामुळे 'संगणक आणि इंग्रजी' हे लोकांच्या मनात घट्ट झालेले समीकरण तोडणे शक्य झाले आहे.

तंत्रज्ञानातील या वेगवान प्रगतीने शास्त्रीय संशोधनांची नवनवीन साधने उपलब्ध केली आहेत. त्यामुळे गेल्या पंचवीस – तीस वर्षांमध्ये विविध शास्त्रांमधील संशोधनांनाही गती आली. याचाच एक भाग असा की, याच काळात, मुलांबाबतच्या संशोधनात रस घेणारी जी शास्त्रे होती त्यांच्यात उत्साहाचे वातावरण निर्माण होऊन मुलांबाबतची, त्यांच्या शारीरिक विकासाविषयी, मेंदूतील प्रक्रियांविषयी, भाव–भावनांविषयी, भाषा आकलनाविषयी अशी अनेक प्रकारची नवी नि नेमकी माहिती आता पुढे येवू लागली आहे. बालमानसशास्त्र, मज्जामानसशास्त्र, विकासक भाषा मानसशास्त्र अशा नव्या शास्त्रांचा तर उगम झालाच आहे. पण, त्यांनी बालकांविषयी पुढे आणलेली माहिती हा आता बालशिक्षण शास्त्राचा नवा पाया ठरू लागला आहे. याच तीन शास्त्रांमधून नवीन सैध्दांतिक संकल्पना निर्माण झाल्या आहेत, त्यांचा उदाहरणादाखल उल्लेख करता येइल.

१) मेंदू आपला 'शिकण्या'चा अवयव आहे, हे आता नीटपणे कळले आहे. त्यामुळे सारी शिक्षणरचना ही मेंदूला पूरक असावी, विघातक ठरू नये, असा विचार पुढे आला आहे. यातूनच 'मेंदूआधारित शिक्षण' अशी नवीन सैध्दांतिक संकल्पना, शिक्षणाला आधार होवू पाहात आहे.

२) मेंदू संशोधनानेच बुध्दिमत्तेविषयीच्या विचाराला अलिकडे नवसंजीवनी दिली आहे. बुध्दिमत्ता ही एक नसून अनेक असतात, प्रत्येकच माणूस

बुध्दिमत्तासंपन्न असतो, फक्त प्रत्येकाच्या बुध्दिमत्तेचे क्षेत्र भिन्न असू शकते. बुध्दिमत्ता प्रयत्नांनी वाढू शकतात, अशा कल्पना मांडणारा 'बहुविध बुध्दिमत्तांचा सिध्दांत' सर्वमान्य होत असून, त्यावर आधारित अशा शिक्षण प्रणालीचे एक वेगळेच रूप, साऱ्या शिक्षण क्षेत्राला आकर्षित करीत आहे.

३) ज्ञानाच्या साऱ्या अंगांना पायाभूत असणारी आणि संपूर्ण मानवी व्यवहारांना दशांगुळे व्यापून उरणारी अशी कोणती गोष्ट असेल तर ती म्हणजे आपली आत्मसात केलेली पहिली भाषा किंवा परिसर भाषा किंवा मातृभाषा. लहान वय हा भाषा आत्मसात करण्याचा सर्वोच्च काळ असतो आणि मुलांची, भाषा आत्मसात करण्याची उपजत क्षमता साधने आणि परिसरातील बाह्य जगाकडून त्यांना मिळणारे सहाय्य यांच्या मीलनांतून भाषा विकास साध्य होत असतो. असे भाषा शिक्षणाचे नवे तत्त्व उदयास आले आहे.

अशी नव्या जगाच्या नव्या शिक्षणाची नवी रचनाच तयार होत आहे. बालशिक्षणाच्या मर्यादित क्षेत्रापुरते बोलायचे झाले तर बालशिक्षणाच्या आजवरच्या तात्त्विक विचारांना आपल्या पोटात घेऊन, नव्या शास्त्रज्ञानाच्या आधारावर नवीन तत्त्वांचा उदय झाला आहे. इथून पुढं बालशिक्षणाची सर्व व्यावहारिक मांडणी याच तत्त्वांच्या आधारावर व्हावी असे सुचविणे हा आजच्या माझ्या भाषणातील प्रमुख मुद्दा आहे.

१) बालशिक्षणाचे पहिले तत्त्व असणार आहे ते 'स्वयंशिक्षणाचे तत्त्व'. प्रत्येक मूल आपले आपण शिकत असते हे लक्षात घेऊन आता पुढे शिक्षणरचनेत मुलांना 'शिकविणे' केंद्रस्थानी न ठेवता, मुलांचे 'शिकणे' केंद्रस्थानी ठेवून आपल्या विचार व आचारांची दिशा बदलायची आहे.

२) मेंदू हा माणसाचा शिकण्याचा अवयव आहे, आणि मेंदूचे शिकणे हे सर्वस्वी त्याला क्षणोक्षणी मिळणाऱ्या अनुभवांवर अवलंबून आहे. कृतिपूर्ण अनुभव हेच मेंदूचे खाद्य आहे. त्यामुळे शिक्षणाचे आणि त्यातही बालशिक्षणाचे दुसरे महत्त्वाचे तत्त्व ठरते, ते म्हणजे, 'अनुभवतत्त्व' होय.

३) मेंदूने घेतलेल्या अनुभवांचेच रूपांतर ज्ञाननिर्मितीत होत असते. याचे कारण मुले उपजतच, आपल्या ज्ञानेंद्रियांनी नि कर्मेंद्रियांनी घेतलेल्या अनुभवांचा अर्थ आपला आपण लावत असतात. असा आपण स्वतःच अर्थशोध घेत जाणे ही नैसर्गिक घटना असते. आपल्या अनुभवांना अर्थपूर्णतेचे अधिष्ठान देणे म्हणजेच

ज्ञाननिर्मिती होणे ! त्यामुळे 'स्वरचित अर्थपूर्णतेचे तत्त्व' हे बालशिक्षणाचे तिसरे तत्त्व होय.

४) आजूबाजूला घडणाऱ्या घटना, असणाऱ्या व्यक्ती तसेच भौतिक वस्तू नि अभौतिक संकल्पना यांचे जग आकळून घेणे किंवा यांच्या विविधांगी अनुभवांचे रूपांतर ज्ञानात करीत जाणे ही मुलांची सहजप्रवृत्तीच आहे, या प्रवृत्तीचे एक वैशिष्ट्य असे आहे की, ती सातत्यपूर्ण आहे, सतत चालणारी प्रक्रिया आहे. ज्ञानाचा एक तुकडा आत्मसात झाला की, मुलांना पुढच्याची भूक असते. त्यामुळे मुले सततच, नवनव्या अनुभवांसाठी हपापलेली असतात; सतत नवनवी आव्हाने घेत जाणे हा त्यांचा आनंदाचा भाग असतो. म्हणूनच 'आव्हानतत्त्व' असे बालशिक्षणाचे एक नवे तत्त्व आपण लक्षात घेतले पाहिजे.

५) आत्तापर्यंत वर्णन केलेली सारी तत्त्वे व्यवहारात म्हणजे आपल्या घरांमधून आणि शाळांमधून आणायची असतील तर नियोजनपूर्वक आखणी आणि कल्पकतापूर्वक मांडणी करावी लागते. या आखणीला आणि मांडणीला एका धाग्यात गुंफून आपण शिकण्यासाठी सुयोग्य वातावरण निर्माण करू शकतो. त्यामुळे हे 'वातावरण निर्मितीचे तत्त्व' किंवा 'व्यवस्थेचे तत्व' हे बालशिक्षणाचे दिशादर्शक असे तत्त्व म्हणून आपल्याला सांगता येईल.

६) बालकांच्या भोवतालच्या शैक्षणिक वातावरण निर्मितीचा बालकांना आस्वादपूर्ण उपयोग करून घेता आला पाहिजे आणि हे नेहमीच बालकाच्या त्या त्या वेळच्या मनःस्थितीवर अवलंबून असते. मनःस्थिती कशी असायला हवी, याचा एक साधा नियम सांगता येईल. मनःस्थिती ही प्रसन्न असावी. याचाच दुसरा अर्थ असा की, कुठल्याही प्रकारचे भावनिक ताण मुलांवर, शिकण्याच्या वेळेस असता कामा नयेत. कारण, भावना हाच बौध्दिक कार्याचा व्दारपाल मानला जातो. त्यामुळे 'भावनिक सुरक्षिततेचे तत्व' बालशिक्षणात प्रत्यक्ष काम करणारांनी लक्षात घेतले पाहिजे.

७) मुलांच्या शिकण्यासाठी जी वातावरण निर्मिती करावयाची असते, ती त्यांच्या परिसराच्या संस्कृतीपासून तुटलेली अशी असून चालत नाही. कारण, तसे झाले तर मुलांना आव्हाने घेऊनही अर्थपूर्णतेचा शोध नेमकेपणाने घेणे अशक्य होऊन बसते. ( इंग्रजी माध्यमांतून शिकणाऱ्या मराठी मुलांची नेमकी हीच गत होते ! ) परिणाम असा होतो की त्यांच्या ज्ञाननिर्मितीच्या प्रक्रियेची सहजताच

हरवते. खरे असे आहे की, आपले जीवन आणि म्हणून आपले शिक्षणही विशिष्ट, घट्टपणे, शेकडो वर्षांच्या बांधणीतून उभारल्या गेलेल्या संस्कृतीच्या कोंदणातच घडत असते. त्याचे भान ठेवणारे, बाल शिक्षणाचे आणखी एक तत्त्व म्हणजे 'स्व-संस्कृतीचे तत्त्व' होय.

८) स्वसंस्कृतीला अर्थ देणारा एक पक्का घटक असतो तो म्हणजे स्वभाषेचा घटक. भाषा हे केवळ संवाद संपर्काचेच नव्हे तर ते विचारांचे नि सर्जनतेचेही साधन असते. त्यामुळे प्रत्येक बालकाच्या बाबतीत लहान वयांतच स्वभाषा समृध्दीचे उद्दिष्ट डोळ्यांपुढे ठेवूनच बालशिक्षणाची रचना होणे आवश्यक आहे. यालाच आपण 'स्वभाषा समृध्दीचे तत्त्व' असे म्हणू या.

बालशिक्षणाची ही आठ तत्त्वे म्हणजे मेंदू आधारित शिक्षणाची तत्त्व म्हणूनही स्वीकारता येतील. मेंदूला बौध्दिकदृष्ट्या, कार्यक्षमतेने कार्यरत ठेवणारे हे अष्टप्रधान आहेत.

आता आपल्याला जो 'शास्त्रीय बालशिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणा'चा आग्रह धरायचा आहे, त्यासाठी ही सैध्दांतिक स्वरूपाची व्यावहारिक तत्त्वे आपण समाजातील प्रत्येक प्रौढापर्यंत पोचविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

## प्रश्नांकडून उत्तराकडे

आपले प्रश्न ओळखणे, प्रश्नांना विचारपूर्वक सामोरे जाणे, आणि प्रश्नांच्या सोडवणुकीची वाटचाल करणे, हे कोणत्याही समाजगटाच्या जिवंतपणाचे लक्षण आहे.

गेल्या शतकभराचा, बालशिक्षणाचा भारतातील इतिहास असे सांगतो की, आपण बालशिक्षणाचे प्रश्न नेमकेपणाने ओळखले आहेत. काही प्रमाणात त्या प्रश्नांना विचारपूर्वक सामोरे जाण्याचा आणि या प्रश्नाच्या सोडवणुकीची वाटचाल करण्याचा प्रयत्न, बालशिक्षणातील आद्य शिक्षणतज्ज्ञांनी यापूर्वी केला आहे. बालशिक्षणाचे एक आंदोलनच या मंडळींनी आपल्या काळात उभे केले. त्याने बालशिक्षण देशभरात ओळखीचे झाले. परंतू प्रत्यक्ष शास्त्रीय बालशिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे काम मात्र त्यांच्या कामाच्या मर्यादेत होऊ शकले नाही.

## महाराष्ट्र बालशिक्षण परिषद

महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेच्या स्थापनेने, निदान महाराष्ट्रात तरी शास्त्रीय बालशिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणा चे ध्येय समोर ठेवून बालशिक्षणाच्या दुसऱ्या किंवा नव्या आंदोलनाची सुरुवात झाली आहे.

## बालशिक्षण संशोधन व विकास केंद्र

महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेच्या स्थापना – अधिवेशनातच 'बालशिक्षण संशोधन व विकास केंद्र' निर्माण करावे यासाठी ठराव करण्यात आला. लगोलग त्याची निर्मितीही करण्यात आली. १५ नोव्हेंबर १९९५ ला प्रसिध्द शिक्षणतज्ज्ञ डॉ. वि. गो. कुलकर्णी यांच्या हस्ते या केंद्राचे औपचारिक उद्घाटन झाले.

आजवर या केंद्राने अनेक उपक्रम बालशिक्षणाच्या विकास–विस्तारासाठी केले. अभ्यासगट चालविणे, बालवाडीचा शिक्षणक्रम व बालवाडी प्रशिक्षणाचा विकासभिमुख शिक्षणक्रम तयार करणे, संदर्भ ग्रंथालय उभे करणे, बालशिक्षण – नेतृत्व निर्मितीसाठी अभ्यास – शिबिरे आयेजित करणे, बालशिक्षणात कार्य करणाऱ्या संस्थांचे नमुना अभ्यास करणे, अनेक पुस्तिका प्रकाशित करणे, आणि अगदी अलीकडचे काम म्हणजे, महाराष्ट्र ज्ञानमहामंडळाच्या सहाय्याने 'नवशिक्षणाचे विश्व' या नावाने, ई– मासिक चालविणे, असे अनेक उपक्रम, या केंद्राकडून चालविले गेले. परंतु याच काळातील, परिषदेचा आणि संशोधन केंद्राचा आढावा घेताना, असे लक्षात आहे की, बालशिक्षण या विषयाच्या सर्वांगांना भिडण्याचे प्रयत्न जरी झाले असले, तरी बालशिक्षणाच्या सामाजिक गरजेचा विचार करता हे प्रयत्न निखालसपणे अपुरेच आहेत. विशेषतः शास्त्रशुध्द बालशिक्षणाचा प्रचार – प्रसार आणि ज्ञानविस्तार ज्या व्यापक स्तरावर व्हायला हवा आहे तेवढा तो करण्यात परिषदेचे प्रयत्न अपुरेच पडताहेत. महाराष्ट्रासारखे एक राज्य जरी डोळ्यांसमोर ठेवले तरी बालशिक्षणाची गरज असणाऱ्या सहा – आठ वर्षांपर्यंतच्या मुलांची संख्या दोन – अडीच कोटींच्या घरात असेल. चार – पाच कोटी पालकांना बालशिक्षणाच्या महत्त्वाची नि त्याच्या शास्त्रीयतेची जाणीव

निर्माण व्हायला हवी आहे. विविध ठिकाणी, तुटकपणे, वेगवेगळ्या कालमानाच्या प्रशिक्षणातून घडणारी, दीड – दोन लाख शिक्षिकांची पिढी फारच अपुऱ्या आकलनाने आणि अपुऱ्या साधनांनी मुलांच्या शिक्षणाला भिडत आहे. शासकीय स्तरावर बालशिक्षण हा विषय जवळजवळ दुर्लक्षितच आहे. अशा परिस्थितीवर मात करण्याची झाल्यास परिषदेच्या कार्याचा व्याप आज आहे त्याच्या किमान हजारपट तरी वाढवायला हवा. अर्थातच हे काम केवळ उपलब्ध असलेल्या मानवी श्रमाने होणे केवळ अशक्यच आहे. 'बालशिक्षण' या नव्याने पुढे येत असलेल्या ज्ञानक्षेत्रात, नेतृत्व देणाऱ्या कार्यकर्त्यांचा वर्ग विस्तारला गेला पाहिजेच, पण त्याच्या हाती प्रसारासाठी नवतंत्रज्ञानाचीही जोड दिली पाहिजे. आजच्या संगणक युगात या विकासक अशा नवतंत्रज्ञानाच्या सहाय्याने ज्ञानप्रसाराची व्याप्ती वाढवून, ज्ञानमुक्तीच्या मार्गाने जाणे सहज शक्य होणार आहे.

बालशिक्षणाच्या क्षेत्रात ही क्रांती घडवून आणणे हे आपले काम आहे. हीच आपल्या इथून पुढच्या कार्याची एक नवी दिशा असणार आहे.

'शास्त्रीय बालशिक्षणाचे सार्वत्रिकीकरण' हे आपले ध्येय आहे. हे ध्येय आणि बालशिक्षणाचा शास्त्रीय आशय घेवून परिषद पुढे आली आहे आणि तिची महाराष्ट्रभर, आणि पुढे देशभर व्याप्ती वाढविण्यासाठी आवश्यक ते तंत्रज्ञान आणी व्यवस्थापनज्ञान घेऊन महाराष्ट्र ज्ञान महामंडळ पुढे सरसावले आहे. या दोन बलाढ्य संस्थांच्या युतीतून एक नवे कार्य, बालशिक्षणाचे विद्यापीठ, बाशिक्षणाची अकादमी उभी करण्याचा मानस आहे.

भारतातला माणूस बळकट आणि पायाभूत अशा शास्त्रोक्त शिक्षणातूनच घडणार आहे. भविष्यकाळाने वर्तमानकाळाला घातलेली हा हाक आहे. आपणा सर्वांच्या साक्षीने, आपण या हाकेला प्रतिसाद देऊन आपल्या कर्तव्याची पूर्ती करू या; आपल्या या छोट्याशा अशा जीवनाची भव्य अशी कार्यपूर्ती करू या.

मुद्रक – यशवंत प्रेस, वाई